**महाराष्ट्र शासन**

क्रमांक : सीईआर-१११४/६१६/३०(राजशिष्टाचार)
सामान्य प्रशासन विभाग,
सचिवालय जिमखाना, पहिला मजला,
मंत्रालयासमोर, मुंबई .
दिनांक : २१ एप्रिल, २०१४

प्रति,

पोलिस महासंचालक, महाष्ट्र राज्य, मुंबई.
सर्व विभागीय आयुक्त,
सर्व जिल्हाधिकारी.

**विषय : महाराष्ट्र राज्य स्थापनेचा चौपन्नावा वर्धापन दिन समारंभ - १ मे, २०१४.**

महाराष्ट्र राज्य स्थापनेला दिनांक १ मे, २०१४ रोजी ५४ वर्ष पूर्ण होत आहेत. त्यानिमित्ताने राज्यभर परिशिष्ट "अ" मध्ये नमूद केल्याप्रमाणे कार्यक्रम आयोजित करण्यात यावेत असे शासनाने ठरविले आहे. त्याप्रमाणे सर्व संबंधितांनी कार्यवाही करावी :-

**अ) मुंबई, विभागीय मुख्यालये, जिल्हा मुख्यालये, उपविभागीय मुख्यालये, तहसील मुख्यालये तसेच इतरत्र सर्व ठिकाणी ध्वजारोहणाचा मुख्य शासकीय समारंभ राज्यभर एकाच वेळी सकाळी ८ वाजता आयोजित करावा. जास्तीत जास्त व्यक्तींना या मुख्य शासकीय समारंभात सहभागी होता यावे, यासाठी या दिवशी सकाळी ७.१५ ते ९ च्या दरम्यान ध्वजारोहणाचा किंवा इतर कोणताही शासकीय किंवा अर्धशासकीय समारंभ करण्यात येऊ नये. जर एखाद्या कार्यालयास अथवा संस्थेला आपला स्वतःचा ध्वजारोहण समारंभ करावासा वाटल्यास त्यांनी तो समारंभ सकाळी ७.१५ च्या पूर्वी किंवा सकाळी ९ च्या नंतर करावा.**

ब) मुंबई, विभागीय मुख्यालये व जिल्हा मुख्यालये या ठिकाणी ध्वजारोहणाच्या कार्यक्रमाबरोबरच पोलीस, गृहरक्षक दले, नागरी संरक्षण दले , अग्निशामक दले इत्यादींचा समारंभीय संचलनाचा कार्यक्रम आयोजित करावा.

क) मुंबई, नागपूर तसेच इतर विभागीय जिल्हा मुख्यालयांच्या ठिकाणी व इतरत्र शासकीय इमारतींवर माफक प्रमाणात विद्युत रोषणाई करण्यात यावी.

ड) मुंबई, विभागीय मुख्यालये आणि जिल्हा मुख्यालयांचे ठिकाणी नेहमीप्रमाणे सांस्कृतिक कार्यक्रम आयोजित करण्यात यावेत. **तथापि, सांस्कृतिक कार्यक्रमाचे आयोजन हे देशभक्तीपर व शहिदांच्या स्मृतिसाठी फक्त असावे, त्याला कोणत्याही करमणूकीचे कार्यक्रमाचे स्वरुप नसावे.** याबाबतची उचित कार्यवाही नेहमीप्रमाणे सांस्कृतिक कार्य विभागातर्फे करण्यात यावी.

इ) विभागीय मुख्यालये, जिल्हा मुख्यालये, उपविभागीय मुख्यालये आणि तहसील मुख्यालयांचे ठिकाणी प्रभातफेऱ्या आयोजित कराव्यात.

२. पोलीस महासंचालक, महाराष्ट्र राज्य यांना विनंती करण्यात येते की, त्यांनी संबंधित विभागीय आयुक्त, संबंधित जिल्हाधिकारी व नेहमी संचलनात भाग घेणाऱ्या पथकांच्या अधिकाऱ्यांशी विचारविनिमय करुन मुंबई, विभागीय मुख्यालये व जिल्हा मुख्यालये येथे संयुक्त संचलनाची व्यवस्था करावी.

३. विभागीय आयुक्त, कोंकण विभाग, पुणे, नागपूर, औरंगाबाद, नाशिक आणि अमरावती यांनी आपआपल्या मुख्यालयाच्या ठिकाणी समारंभाची आवश्यक व्यवस्था सर्व संबंधितांच्या सल्लामसलतीने करावी. **कोकण विभागीय मुख्यालय वाशी, नवी मुंबई येथे श्री. जयंत पाटील, मंत्री ग्रामविकास यांच्या हस्ते व धुळे येथे श्री. राजेंद्र गावित, राज्यमंत्री आदिवासी विकास विभाग हे ध्वजारोहण करतील. इतर सर्व विभागीय व जिल्हा मुख्यालयाच्या ठिकाणी त्या-त्या जिल्ह्याच्या पालकमंत्री महोदयांच्या हस्ते राष्ट्रध्वजारोहण होईल. यावर्षी महाराष्ट्र दिनाच्या कार्यक्रमाच्यावेळी सार्वत्रिक लोकसभा निवडणूक २०१४ च्या अनुषंगाने आदर्श निवडणूक आचारसंहिता अंमलात असणार आहे. आचारसंहितेच्या कालावधीत राष्ट्रध्वजारोहण करण्याबाबत केंद्रिय निवडणूक आयोगाच्या मार्गदर्शक सूचनांनुसार कोणत्याही परिस्थितीत महाराष्ट्र दिनाच्या कार्यक्रमाचा राजकीय व्यासपीठासारखा वापर होता कामा नये. याप्रसंगी कोणत्याही स्वरुपाचे राजकीय भाषण होऊ नये याची दक्षता घेण्यात यावी. तसेच ध्वजारोहण करणारे मंत्री महोदय काही अपरिहार्य कारणामुळे कार्यक्रमस्थळी वेळेवर पोहचू न शकल्यास विभागीय मुख्यालयी विभागीय आयुक्त यांनी आणि जिल्हा मुख्यालयी जिल्हाधिकारी यांनी ध्वजारोहण करावे व ध्वजवंदनाचा कार्यक्रम सुरळीतपणे पार पडेल याची दक्षता घ्यावी.**

४. दिनांक १ मे, २०१४ रोजी राष्ट्रध्वज महाराष्ट्र राज्यात सर्वत्र व सर्व सार्वजनिक व शासकीय इमारतींवर (खेड्यांमध्ये सुध्दा) तसेच ऐतिहासिक महत्वाच्या किल्ल्यांवर (उदा. रायगड, सिंहगड, शिवनेरी, पुरंदर, वसई, प्रतापगड, दौलताबाद, सीताबर्डी, चंद्रपूर, इत्यादी) उभारण्यात यावा.

५. राष्ट्रध्वज लावण्याच्या योग्य पध्दतीबाबत शासन परिपत्रक क्रमांकः एफएलजी- १०९१/३०, दिनांक २० मार्च, १९९१ तसेच परिपत्रक क्रमांकः एफएलजी-१०९१/(दोन)/३०, दिनांक ५ डिसेंबर, १९९१ व परिपत्रक क्र. एफएलजी-१०९८/३४३/३० दिनांक ११ मार्च, १९९८ अन्वये दिलेल्या सूचनांचे काटेकोरपणे पालन करण्याची खबरदारी घेण्यात यावी. समारंभाची रंगीत तालीम घेण्यात यावी.

६. राष्ट्रध्वजाला वंदन करताना "जन-गण-मन" हे राष्ट्रगीत वाजविण्यात यावे. याप्रसंगी कोणत्याही अधिकाऱ्यांनी भाषण करू नये. सलामीच्या वेळी सज्ज असलेला बँड सलामीपूर्वी व सलामीनंतर वाजवावा.

७. दिनांक १ मे, २०१४ रोजी सायंकाळी बृहन्मुंबईत तसेच विभागीय मुख्यालये व जिल्हा मुख्यालये या ठिकाणी विभागीय आयुक्त व जिल्हाधिकारी यांनी सांस्कृतिक कार्य विभाग आणि संचालक, सांस्कृतिक कार्य यांच्या सल्ल्याने देशभक्तीवर व शहिदांच्या स्मृतीसाठी फक्त सांस्कृतिक कार्यक्रम आयोजित करावेत. सांस्कृतिक कार्यक्रमांवर होणारा खर्च नेहमीप्रमाणे सांस्कृतिक कार्य विभागातर्फे भागविण्यात यावा. मुंबईतील खर्चही सांस्कृतिक कार्य विभागाने आपल्या अनुदानातून भागवावा.

८. जिल्ह्यातील संसद सदस्य, विधान परिषद व विधान सभा सदस्य, नगरसेवक, तसेच विविध क्षेत्रातील शासकिय पुरस्कारप्राप्त मान्यवर उदा. दलित मित्र तसेच कृषी, शिक्षण, क्रीडा, सांस्कृतिक, सामाजिक, पत्रकारिता इ. क्षेत्रातील पुरस्कारप्राप्त मान्यवर व्यक्ती, प्रमुख नागरिक आणि शासकीय अधिकारी यांना मुख्य शासकीय कार्यक्रमास हजर राहण्यास निमंत्रित करावे.

९. विभागीय आयुक्त पुणे, नागपूर, औरंगाबाद, नाशिक व अमरावती हे त्यांच्या मुख्यालयात ध्वजारोहण समारंभाकरिता योग्य ती व्यवस्था करणार असल्याने तेथील जिल्हाधिकारी यांनी वेगळे कार्यक्रम करण्याची आवश्यकता नाही. विभागीय आयुक्त, कोकण विभाग, हे वाशी येथील समारंभाची व्यवस्था करतील.

१०. ध्वजारोहण समारंभाला सर्व शासकीय अधिकारी व कर्मचारी यांनी अगत्यपूर्वक उपस्थित राहण्याबाबत व उपस्थित राहणाऱ्या सर्व व्यक्तींना समारंभाचे वेळी राष्ट्रीय पोषाख परिधान करण्याबाबतचे आदेश मंत्रालयीन विभाग, विभागीय आयुक्त व जिल्हाधिकारी यांनी सर्व संबंधितांना द्यावेत.

११. संबंधित विभागीय आयुक्त व जिल्हाधिकारी यांनी आपआपल्या अधिकार क्षेत्रात महाराष्ट्र दिन समारंभ साजरा करण्यासंबंधी आवश्यक ती सर्व कार्यवाही करावी. विभागीय आयुक्त व जिल्हाधिकारी यांना विनंती करण्यात येते की, **या परिपत्रकात दिलेले अनुदेश योग्य त्या प्रकारे पाळण्यात येतील याची त्यांनी योग्य ती दक्षता घ्यावी.**

(अजय अंबेकर)
उप सचिव, महाराष्ट्र शासन.

क्रमांक : सीईआर-१११४/६१६/३०(राजशिष्टाचार)
सामान्य प्रशासन विभाग,
सचिवालय जिमखाना, पहिला मजला,
मंत्रालयासमोर, मुंबई.
दिनांक : २१ एप्रिल, २०१४

प्रत माहितीसाठी अग्रेषित :-
मुख्य सचिव.
सर्व अप्पर मुख्य सचिव, मंत्रालयीन विभाग.
सर्व प्रधान सचिव / सर्व सचिव, मंत्रालयीन विभाग.
मा. राज्यपाल यांचे सचिव.
मुख्यमंत्री यांचे सचिव.
उपमुख्यमंत्री यांचे प्रधान सचिव.
राज्यपाल यांचे परिवार प्रबंधक, राजभवन, मुंबई (२ प्रती).
प्रधान सचिव, महाराष्ट्र विधान मंडळ, सचिवालय, मुंबई (५ प्रती) (पत्राने).
सचिव, महाराष्ट्र लोकसेवा आयोग, मुंबई (पत्राने).

प्रबंधक, मुख्य न्याय शाखा, उच्च न्यायालय, मुंबई (पत्राने).
प्रबंधक, उच्च न्यायालय, अपील शाखा, मुंबई (पत्राने).
प्रबंधक, लोकआयुक्त कार्यालय, महाराष्ट्र राज्य, मुंबई (पत्राने).
प्रबंधक, महाराष्ट्र प्रशासकीय प्राधिकरण, मुंबई (पत्राने).
फ्लॅग ऑफिसर कमांडिंग इन चीफ, वेस्टर्न नेव्हल कमांड, शहीद भगतसिंग रोड, मुंबई (पत्राने).
जनरल ऑफिसर कमांडिंग, महाराष्ट्र व गुजरात विभाग, कुलाबा, मुंबई.
एअर ऑफिसर कमांडिंग, हेडक्वार्टर्स, मेरीटाईम्स एअर ऑपरेशन्स, आयएएफ, आयएएफ बिल्डींग, धोबी तलाव, मुंबई.
स्टेशन कमांडर, इंडियन एअर फोर्स स्टेशन, मुंबई.
सर्व मंत्रालयीन विभाग (मंत्रालयीन विभागाच्या अधिपत्याखालील सर्व विभाग प्रमुख व कार्यालय प्रमुखांना कळविण्याच्या विनंतीसह).
केंद्र संचालक, दूरदर्शन, वरळी, मुंबई.
केंद्र संचालक, आकाशवाणी, मुंबई, नागपूर, पुणे, औरंगाबाद.
पोलिस आयुक्त, मुंबई, नागपूर, पुणे, ठाणे, नाशिक, औरंगाबाद, सोलापूर, नवी मुंबई.
आयुक्त, बृहन्मुंबई महानगर पालिका, मुंबई.
महापालिका आयुक्त, मुंबई, नागपूर, पुणे, ठाणे, नाशिक, औरंगाबाद, सोलापूर, कोल्हापूर,ठाणे, कल्याण, अमरावती, पिंपरी- चिंचवड, सांगली, मिरज, कुपवाड, अकोला, नवी मुंबई, परभणी, नांदेड.
सर्व पोलिस उप महानिरिक्षक.
महासमादेशक, नगरसेना, मुंबई.
सर्व मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषदा.
सर्व जिल्हा पोलिस अधिक्षक.
महालेखापाल - १, महाराष्ट्र, मुंबई (पत्राने).
महालेखापाल - २, महाराष्ट्र, नागपूर (पत्राने).
महालेखापरिक्षक, मुंबई.
अधिदान व लेखा अधिकारी, मुंबई.
निवासी लेखा अधिकारी, बांद्रा कुर्ला कॉम्पलेक्स, मुंबई.
महासंचालक, माहिती व जनसंपर्क महासंचालनालय, मुंबई.
संचालक, सांस्कृतिक कार्य संचालनालय, महाराष्ट्र राज्य, जूने सचिवालय, मुंबई.
सभापती, महाराष्ट्र विधान परिषद / उप सभापती, महाराष्ट्र विधान परिषद, यांचे खाजगी सचिव.
अध्यक्ष, महाराष्ट्र विधानसभा / उपाध्यक्ष, महाराष्ट्र विधानसभा यांचे खाजगी सचिव.
विरोधी पक्ष नेता, विधानसभा / विधान परिषद, यांचे खाजगी सचिव.
मुख्यमंत्री, यांचे खाजगी सचिव.
मुख्यमंत्री यांचे जनसंपर्क अधिकारी
उपमुख्यमंत्री यांचे खाजगी सचिव.
उपमुख्यमंत्री यांचे, जनसंपर्क अधिकारी, मुंबई.
सर्व मंत्र्यांचे आणि राज्यमंत्र्यांचे खाजगी सचिव.
संचालक, क्रिडा व युवक सेवा, सेंट्रल बिल्डींग, पुणे.
कार्यकारी अभियंता, सार्वजनिक बांधकाम विभाग - १, मुंबई.
कार्यकारी अभियंता, सार्वजनिक बांधकाम विभाग - २, मुंबई.
कार्यकारी अभियंता, मध्य मुंबई विद्युत विभाग, सार्वजनिक बांधकाम विभाग, मुंबई.
कार्यकारी अभियंता, दक्षिण मुंबई विद्युत विभाग, सार्वजनिक बांधकाम विभाग, मुंबई.
संचालक, उद्याने व उपवने, मुंबई.
संचालक, सांस्कृतिक कार्य, महाराष्ट्र राज्य, मुंबई, यांनी मुंबई तसेच विभागीय व जिल्हा मुख्यालयांच्या ठिकाणी **देशभक्तीवर शहिदांच्या स्मृतीसाठी** कार्यक्रम आयोजित करण्यासाठी योग्य ती व्यवस्था करावी. मुंबईत दरवर्षीप्रमाणे चौपाटी, नरे पार्क, बांद्रे येथील शासकीय कर्मचारी वसाहत या ठिकाणी सांस्कृतिक कार्यक्रमाचे आयोजन करावे. **या कार्यक्रमाला कोणत्याही प्रकारच्या करमणुकीच्या कार्यक्रमाचे स्वरुप नसावे.**

(अजय अंबेकर)
उप सचिव, महाराष्ट्र शासन.

(दिनांक १ मे, २०१४ महाराष्ट्र स्थापनेचा वर्धापन दिन. जा.क्र.सीईआर-१११४/६१६/३०(राजशिष्टाचार) दिनांक: २१ एप्रिल, २०१४ चे सहपत्र.)

## परिशिष्ट — "अ"

## मुंबई

**दिनांक १ मे, २०१४**

**सकाळी ७ वाजता** : मा. मंत्री (राजशिष्टाचार) व इतर मान्यवरांच्या हस्ते हुतात्मा चौकातील हुतात्मा स्मारकास पुष्पचक्र अर्पण करण्याचा कार्यक्रम होईल.

**सकाळी ८ वाजता** : शिवाजी पार्क येथे ध्वजारोहण व संचलन.

**सायंकाळी** : महाराष्ट्राच्या गौरवपर सांस्कृतिक कार्यक्रमाचे मुंबईत आयोजन **या कार्यक्रमाला कोणत्याही प्रकारच्या करमणुकीच्या कार्यक्रमाचे स्वरुप नसावे.**

## विभागीय व जिल्हा मुख्यालये.

**सकाळी** : प्रभातफे-या.

**सकाळी ८ वाजता** : ध्वजारोहण.
संयुक्त संचलन.

**सायंकाळी** : महाराष्ट्राच्या गौरवपर सांस्कृतिक कार्यक्रमाचे मुंबईत आयोजन **या कार्यक्रमाला कोणत्याही प्रकारच्या करमणुकीच्या कार्यक्रमाचे स्वरुप नसावे.**

## उप विभागीय व तहसील मुख्यालये व इतर ठिकाणी

**सकाळी** : प्रभातफे-या.
**सकाळी ८ वाजता** : ध्वजारोहण.

**********